को.प.बंधारा मुंढेवाडी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर या योजनेस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुप्रमा २०१२/(८७/२०१२)/ल.पा.१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०१ ऑगस्ट, २०१९

वाचा-

१) **कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे जा.क्र.मकृखोविमं/२११/(९७७/२०११)/लपा-१/१६२९, दि.०७/०३/२०१२ चे पत्र.**

प्रस्तावना-

को.प.बंधारा मुंढेवाडी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर या योजनेस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा निर्णय क्र.मकृखोविमं २९६/ १३५ (९६)/ प्रशा-३/ मुंढेवाडी को.प.बंधारा, दिनांक १०/१०/१९९६ अन्वये एकुण रु.२७६.५७ लक्ष इतक्या किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदर मूळ प्रशासकिय मान्यता प्रस्ताव सन १९९५-१९९६ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आलेले होते. प्रकल्पाचे काम सुरु असतांना दरसूचीतील दरातील फरकामुळे वाढ,भूसंपादन किंमतीतल वाढ, जास्त दराची निविदा स्विकृतीमुळे,संकल्पचित्र बदलामुळे, अपुरी तरतूद व अनुषंगिक खर्चातील वाढीमुळे सन १९९९-२००० ची दरसूची वापरुन सुधारित अंदाजपत्रक तयार करुन रु.४८६.४५ लक्ष इतक्या किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय-

१) संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांनी सादर केलेल्या को.प.बंधारा मुंढेवाडी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर या योजनेस सन १९९९-२००० ची दरसूचीवर आधारित केलेल्या सुधारित अंदाजपत्रकानुसार कामाच्या अंदाजित रु. ४८६.४५ लक्ष (रुपये चार कोटी शाऐंशी लक्ष पंचेचाळीस हजार फक्त) या किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून प्रदान करण्यात येत आहे. (कामासाठी रु.४४२.२३ लक्ष व अनुषंगिक खर्चासाठी रु.४४.२२ लक्ष) अंदाजित किंमतीचा गोषवारा सोबत जोडलेल्या परिशिष्ट- अ मधील विवरणपत्रात देण्यात आला आहे.

१) लाभधारकांची पाणी वापर सहकारी संस्था स्थापन करावी.
२) जास्त दराची निविदा स्विकृती सक्षम स्तरावर करण्यात आली असल्याची खातरजमा करावी.
३) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयी करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहित धरता येणार नाही.
४) या योजनेबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशीची कार्यवाही पूढे चालू राहील. सदर सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.
५) सदर योजनेसाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित

शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे, वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपद्धती याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

२) या योजनेच्या कामावरील खर्च मुख्य लेखाशिर्ष मागणी आय ५ "४७०२, लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च १९०,सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, (००), (००)(०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान (ल.पा.) (उर्वरित महाराष्ट्र) (कार्यक्रम) (४७०२ ४७९४) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या मंजूर अनुदानातुन भागविण्यांत यावा. निधीची मंजूरी मिळाल्याशिवाय या योजनेच्या कोणत्याही कामावर खर्च करू नये.

३) हा शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१४/ का.१४३४ दि.१९/०१/२०१७ आणि वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१३४/व्यय १२, दि.०३/०७/२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

४) या योजनेस प्रदान केलेली प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता लपा कार्यासनाच्या प्रशासकिय मान्यता नोंदवहीत अ.क्र. १९७ वर नोंदविण्यांत आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०२१२०५४३०१२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Milind Anand Wani

Digitally signed by Milind Anand Wani
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=811ef2c18db8728b01579fcb3071e86d7af3216659c06a8d34f3d2dda350efea, serialNumber=74547e206b216404acf50aef877b5d61e16ebdf315f88d58c513e53fab55ecf7, cn=Milind Anand Wani
Date: 2019.08.02 12:14:49 +05'30'

(मि. आ. वाणी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- अंदाजित किंमतीच्या गोषवाऱ्यासह :-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपुर.
३. वित्त विभाग (व्यय-१२)मंत्रालय, मुंबई ३२
४. नियोजन जिभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई ३२.
५. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
६. मुख्य अभियंता(वि.प्र.), जलसंपदा विभाग, पुणे.
७. आंतर वित्त सल्लागार व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. जिल्हाधिकारी सोलापूर, सोलापूर.
९. अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर.
१०. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, सोलापूर
११. कार्यासन अर्थ १-२ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क, महासंचालक, मंत्रालय, मुंबई.
१३. लपा संग्रहार्थ.

परिशिष्ट-अ

शासन निर्णय क्र. सुप्रमा २०१२/(८७/२०१२)/ ल.पा.१ दिनांक ०१/०८/२०१९ चे सहपत्र

को.प.बंधारा मुंढेवाडी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर च्या प्रथम सुधारित प्रशासकिय मान्यतेचा अंदाजित किंमतीचा गोषवारा

अ.क्र.	उपशिर्ष	किंमत (रु.लक्ष)
१	अ - प्राथमिक कामे	०.००
२	ब - भू संपादन (जमीन)	०.००
३	सी - कामे	४४१.१३
४	के- इमारती	०.००
५	ओ-संकीर्ण	०.००
६	पी-देखभाल	१.१०
७	आर-दळणवळण	०.००
८	अनुषंगिक खर्च	४४.२२
	एकूण	**४८६.४५**

(रुपये चार कोटी शाऐंशी लक्ष पंचेचाळीस हजार)

ठळक वैशिष्टे:-

१. योजनेची सिंचन क्षमता - ८९७ हेक्टर
२. एकूण पाणी साठा - ६०३७ स.घ.मी.
३. पाणी साठ्याची प्रती स.घ.मी किंमत - रु.८०५८ /-स.घ.मी.
४. लाभव्यय गुणोत्तर - १.२०

Milind Anand Wani

Digitally signed by Milind Anand Wani
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=811ef2c18db8728b01579fcb3071e86d7af3216659c06a8d34f3d2dda350efea, serialNumber=74547e206b216404acf50aef877b5d61e16ebdf315f88d58c513e53fab55ecf7, cn=Milind Anand Wani
Date: 2019.08.02 12:15:52 +05'30'

(मि. आ. वाणी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन